MHKO100003292022

**नियमीत दिवाणी दावा क्र. ७५/२०२२**

मयोद्दीन मुल्ला.
विरुध्द
निखत मुल्ला.

**निशाणी क्र.२१ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला "उलटतपास नाही" चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीतर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा मुस्लीम लॉ प्रमाणे नांदणेस येणेसाठी दाखल केलेला आहे. सदर कामी वादी यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१४ अन्वये दिनांक २९/०९/२०२२ रोजी दाखल केले आहे. त्यानंतर सदर प्रकरण निशाणी क्र.१४ चे उलटतपासावर ठेवण्यात आले. प्रतिवादी यांना संधी देऊन देखील त्यांनी उलटतपास घेतला नाही, त्यामुळे त्यांचेविरुध्द दिनांक ०२/०८/२०२३ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रकरण हे साक्षीदाराचे उलटतपासाकरीता ब-याच काळापासून प्रलंबीत आहे. त्याबाबत प्रतिवादी यांनी असे कारण नमुद केले आहे की, प्रतिवादी हे आजारी असलेमुळे न्यायालयात हजर राहू शकले नाहीत, त्यामुळे वादींचा उलटतपास घेता आला नाही असे कारण नमुद केलेल आहे. परंतु, प्रकरणाची परिस्थिती व नमुद कारण पाहता सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणदोषावर निकाली काढणेकरीता प्रतिवादी यांना बचावाची संधी देणेदेखील योग्य वाटते. प्रतिवादी यांचेमुळे झालेला विलंब व त्यामुळे वादी यांचे झालेले नुकसान याकरीता सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**-:आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी यांनी पुढील तारखेपर्यंत साक्षीदार यांना अदा करावी. तसे न झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.10.04 17:59:05 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०४/१०/२०२३.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 04/10/2023 |
| Order signed by P.O. on | 04/10/2023 |
| Order uploaded on | 04/10/2023 |